## पोलीस अधिक्षक नवनीत कॉवतांची १८ महिन्यापासून झोपलेली यंत्रणा खडबडून जागी झाली

# ज्ञानेश्वरी मुंडेंचा विषारी औषध पिऊन आत्मदहनाचा प्रयत्न

# महादेव मुंडे खून प्रकरणाचा तपास करणारा अधिकारी गोट्या खेळतो का?








(छाया: कृष्णा शिंदे)

**बीड (सरकार): परळीतील महादेव मुंडे खून प्रकरणात पोलिसांकडून होत असलेल्या कारवाईला दिरंगाई होत असल्याचा आरोप करत मृत महादेव मुंडेंच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्यानुसार, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्यासोबत ज्ञानेश्वरी मुंडे यांची आज तब्बल तासभर चर्चा झाली. मात्र, या चर्चेनंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. पोलिसांनी वेळीच सतर्कता दाखवत ज्ञानेश्वरी मुंडेंना ताब्यात घेतले. त्यानंतर, त्यांना तात्काळ बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. विशेष म्हणजे आज आंदोलनावेळी त्यांनी स्वत:च्या अंगावर पेट्रोल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला होता.**

बीडमध्ये गेल्या १८ महिन्यांपासून परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या खून प्रकरणात एकही आरोपी अटक नाही. त्यामुळे यातील आरोपींना अटक करून न्याय मिळावा अशी आग्रही मागणी ज्ञानेश्वरी मुंडे यांची आहे. त्याच अनुषंगाने त्यांनी पोलीस प्रशासनाला दिलेला अल्टिमेटम आज संपला. त्यामुळे, ज्ञानेश्वरी यांनी आपल्या नातेवाईकांसह बीडचे पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले होते. यावेळी, पोलीस अधीक्षकांसोबत त्यांची चर्चा देखील झाली. मात्र, पोलीस अधीक्षकांच्या भेटीनंतर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. सध्या त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माझ्या बहिणीचा संयम सुटला आणि तिने आज आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती ज्ञानेश्वरी मुंडे यांचे भाऊ सतीश फड यांनी दिली. या प्रकरणात पोलीस विभागाने तात्काळ निर्णय घेण्याची गरज असून अधिवेशनात सुप्रिया सुळे, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे यांनी प्रश्न उपस्थित करावा, अशी मागणी फड यांनी केली. महादेव मुंडे खून प्रकरणात पोलीस अधीक्षक यांच्यासोबत चर्चा झाली असून त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेला हा गुन्हा वर्ग केला आहे. तसेच, आरोपीच्या अटकेसाठी पथक पाठविण्यात येणार होते. मात्र, माझ्या बहिणीचा संयम सुटला. दरम्यान, पुढील उपचारासाठी ज्ञानेश्वरी मुंडे यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे.



सायं.दैनिक बीड ■ E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

सरकार

संपादक-आदोडे साहस

Evening Daily beedsarkar



बीड महाराष्ट्र ■ वर्ष १२ वे ■ अंक २७८ वा ■ बुधवार १६ जुलै २०२५ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दिनांक १७ जुलै २०२५ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 12 Issu 278 ■ Wednesday 16 July 2025 ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027

## आनंदराज आंबेडकरांना सोबत घेऊन एकनाथ शिंदेंचा मास्टरस्ट्रोक

# शिवशक्ती-भीमशक्ती युतीची घोषणा

मुंबई (सरकार): आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि आनंदराज आंबेडकर यांची रिपब्लिकन सेना एकत्र निवडणूक लढणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात शिवसेनेचे पक्षप्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज मास्टर स्ट्रोक मारला. त्यांनी शिवशक्ती आणि भीमशक्तीची युती घडवून आणली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू आनंदराज आंबेडकर यांच्या रिपब्लिकन सेनेसोबत युती केली. आगामी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि आनंदराज आंबेडकर यांची रिपब्लिकन सेना एकत्र निवडणूक लढणार आहे. या प्रसंगी आनंदराज आंबेडकर यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेसोबत युती करण्याचा निर्णय का घेतला? ते सांगितलं. महाराष्ट्रात खरं म्हणजे ही युती आजची नाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रबोधनकार ठाकरे यांच्यापासून सुरु झालेली ही युती आहे. खऱ्या अर्थाने महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक परिवर्तन घडवण्यासाठी आम्ही दोन्ही कार्यकर्ते एकत्र आलोय. मी मुद्दाम कार्यकर्ते बोललो कारण एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना कार्यकर्ता म्हणून प्रत्येक तळागाळातल्या व्यक्तीशई त्यांच्या सुखदु:खाशी एकरुप होण्याचा प्रयत्न केला असं आनंदराज आंबेडकर म्हणाले.

# पांगरी तांडा व पांगरी कॅम्पच्या महिलांचा दारूबंदीसाठी एल्गार

परळी (सरकार):परळी ते बीड रोड वरील पांगरी तांडा व पांगरी कॅम्प येथे दारूबंदीसाठी महिलांचा पुढाकार घेतला असून स्वत: दारूचे अवैध अड्डे उध्वस्त केले आहेत. स्वत: दारू पकडून देण्याचे पाऊल आता महिलांनी उचलले आहे. यासाठी परळी ग्रामीण पोलिस व पांगरी गावचे पोलिस पाटील यांच्या मदतीने कारवाई केली. दारूमुळे संसारात कलह निर्माण होत आहेत तसेच दारूड्यांमुळे किरकोळ भांडणेही होतात. परिणामी, गावाच्या शांततेला बाधा पोहोचत आहे. या कटकटीतून एकदाची सुटका घेण्यासाठी गावातील महिला एकत्र आल्या आणि दारूबंदीचा एकमुखाने निर्णय घेतला. पोलिसांनी दारूबंदीसाठी सकारात्मक सहकार्य करावे, अशी विनवणी महिलांनी केली आहे.



परळी वैजनाथ ते बीड राज्य मार्गावरील पांगरी तांडा ते पांगरी कॅम्प येथील गावातील महिलांनी दारूबंदीसाठी बुधवार दि. १६ जुलै रोजी एकत्र येत पुढाकार घेत गावातील अवैध दारू अड्डु उध्वस्त केले आहेत. यासाठी परळी ग्रामीण पोलिस व गावातील पोलिस पाटील यांच्या मदतीने कारवाई केली आहे. पोलिसांनी याबाबत दोन जनावर कारवाई केली आहे. पांगरी तांडा व पांगरी कॅम्प येथे अवैध दारूविक्री मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.गावातील युवकांसह ग्रामस्थ व्यसनाधीन होऊ लागले आहेत. दारूमुळे घराघरात वितुष्ट निर्माण होऊन भांडण-तंटे वाढले आहेत. तळीरामांकडून महिलांना मारझोड होत असून अनेक संसार उद्ध्वस्त होत आहेत.

महिलांना त्रास वाढत असून मुलांचे शिक्षण, आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहेत. त्यामुळे दारूबंदीवर आळा घालावा अशी मागणी पोलिसांकडे केली आहे. महिलांनी दारूविक्रीला आळा घालण्यासाठी पुढाकार घेतला असून गावातील दारूविक्री पूर्णपणे बंद करावी यासाठी एल्गार पुकारत थेट विक्री करणारे व दारू अड्डे उध्वस्त केले आहे. परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस कर्मचारी पाडूरंग टोले, पोलिस कर्मचारी महादेव वाघमारे, पोलिस पाटील ज्ञानोबा (माऊली) मुंडे, माजी उपसरपंच श्रीनिवास मुंडे, गोविंद मुंडे, बिभीषण गित्ते व गावातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थितीत कारवाई केली.

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंचा आज निरोप समारंभ

मुंबई (सरकार): ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या आमदारकीचा कार्यकाळ आज संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर विधान परिषदेत आज अंबादास दानवे यांचा निरोप समारंभ पार पडत आहे. अंबादास दानवे ऑगस्ट २०१९ मध्ये विधान परिषदेवर आमदार म्हणून निवडून आले होते. छत्रपती संभाजीनगर जालना स्थानिक स्वराज्य संस्थामधून निवडून येणाऱ्या विधान परिषदेच्या जागेवर अंबादास दानवे विजयी झाले होते. शिवसेनेत झालेल्या पक्ष फुटीनंतर ऑगस्ट २०२२ मध्ये अंबादास दानवे यांच्यावर विधान परिषदेतील विरोधी पक्षनेतेपदाची धुरा पक्षाने दिली होती. ऑगस्ट २०२५ मध्ये अंबादास दानवे यांचा कार्यकाळ पूर्ण होणार असून या आठवड्यात शुक्रवारी अधिवेशन पूर्ण होत असताना आज अंबादास दानवे यांचा निरोप समारंभ आहे.



अंबादास दानवे हे शिवसेनेचा आक्रमक चेहरा म्हणून ओळखले जातात. अलीकडच्या काळात ठाकरे गटाची बाजू हिरीरीने आणि आक्रमकपणे मांडणाऱ्या नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होतो. आता ते विधानपरिषदेत नसल्यास ठाकरे गटाला आगामी काळात आक्रमक नेत्याची उणीव जाणवण्याची शक्यता आहे. अंबादास दानवे यांच्या विधानपरिषदेतील आमदारकीचा काळ संपुष्टात येणार असल्याने आता राजकीय वर्तुळात ते पुन्हा सभागृहात दिसणार की नाही, याची चर्चा सुरु झाली आहे. सद्यस्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेकडून विधानपरिषेदत आमदार म्हणून निवडून येणं शक्य आहे का, अशी चर्चा आता रंगली आहे.

## महाविकास आघाडीच्या नेत्यांचे टॉवेल-बनियनवर आंदोलन

### एकनाथ शिंदेंच्या नेत्यांना डिवचलं

मुंबई (सरकार): राज्य विधिमंडळाच्या पायऱ्यांवर महाविकास आघाडीच्या नेत्यांनी थेट बनियन-टॉवेलवर आंदोलन केले. यावेळी एकनाथ शिंदेंच्या मंत्र्यांवर विरोधकांनी निशाणा साधला.



विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जितेंद्र आव्हाड, भास्कर जाधव, सतेज पाटील, सचिन अहिर, महेश सावंत आदी नेत्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. तर संजय गायकवाड यांचा बॉक्सिंग अवतारमधील फोटो असलेल्या बॅनरवर 'महाराष्ट्राची लूट करणाऱ्या चड्डी बनियनचा धिक्कार असो', असा उल्लेख करण्यात आला. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील कँटिनमधील जेवणाच्या दर्जावरून कँटिन कर्मचार्यांना मारहाण केली. त्यावेळी संजय गायकवाड हे टॉवेल आणि बनियानवर आले होते. त्यानंतर राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांचाही पैशाची बॅग असलेला व्हिडीओ समोर आला होता. या व्हिडीओत संजय शिरसाट हे बनियावर दिसून आले होते.

## गृह कर्ज स्वस्त होण्याची शक्यता, आरबीआय पुन्हा रेपो रेटमध्ये कपात करणार

मुंबई (सरकार): जर तुम्ही घर खरेदी करण्याचं स्वप्न पाहत असाल तर तुमच्यासाठी खूशखबर आहे. येत्या काळात गृह कर्ज आणखी स्वस्त होण्याची शक्यता आहे. भारतीय रिझर्व्ह बँक रेपो रेटमध्ये पुन्हा एकदा कपात करु शकते. मंगळवारी जारी करण्यात आलेल्या एका रिपोर्टनुसार डिसेंबरमध्ये होणार्या पतधोरणविषयक समितीच्या बैठकीत रेपो रेट २५ बेसिस पॉईंटनं कमी केला जाऊ शकतो.

## संपादकीय

# न्यायवैद्यकाची मदत

एखाद्या आरोपीला अटक झाली म्हणजे तो गुन्हेगार ठरत नाही. संबंधिताविरोधातील न्यायालयात साक्षीपुरावे, परिस्थितीजन्य पुरावे सापडले तरच त्याला शिक्षा होऊन त्याच्या कपाळावर गुन्हेगारीचा शिक्का लागतो. साक्षीदार उलटल्याने आरोपी सुटल्याची प्रकरणे नवीन नाहीत. अलीकडच्या काळात तांत्रिक तपासाआधारे आरोपीला पकडल्याची उदाहरणे समोर येतात. त्यामुळेच, तांत्रिक तपासाचा भाग हा न्यायालयात पुरावे म्हणून फॉरेन्सिक लॅबकडून मागविला जातो. काळाच्या ओघात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये बदल होताना दिसतो. त्यातून फॉरेन्सिक लॅबचे महत्त्व खूप वाढल्याचे दिसते. गुन्ह्यांचा तपास करताना वैज्ञानिक, तांत्रिक पद्धतीचा उपयोग करून, गुन्हेगारांना पकडणे आणि त्यांना शिक्षा देणे हे पोलीस यंत्रणांपुढे मोठे आव्हान असते. त्यामुळे फॉरेन्सिक लॅबच्या माध्यमातून गुन्ह्यांच्या ठिकाणी सापडलेल्या पुराव्यांचे विश्लेषण करून गुन्हेगारांपर्यंत पोहोचायला पोलिसांना मदत होते. डीएनए चाचणी, बोटांचे ठसे, शस्त्रे आणि इतर पुराव्यांचे विश्लेषण करून गुन्ह्याची उकल केली जाते. फॉरेन्सिक लॅबचे निष्कर्ष न्यायालयात महत्त्वाचे मानले जात असल्याने योग्य पुरावे, विश्लेषणामुळे न्यायालयाकडून गुन्हेगारांना शिक्षा देण्यास हेच तांत्रिक पुरावे कारणीभूत ठरतात. फॉरेन्सिक लॅबमध्ये सातत्याने नवीन तंत्रज्ञान आणि पद्धती विकसित होताना दिसत आहे. महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहाय्यक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख पद्धतीचा अवलंब करून न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारकडून जे प्रयत्न सुरू आहेत, ते स्वागतार्ह आहेत.

फॉरेन्सिक सायन्स म्हणजे गुन्ह्याचा तपास करताना वापरावे लागणारे एक शास्त्र. जेव्हा एखादा गुन्हा घडतो, तेव्हा त्या ठिकाणी (गुन्ह्याच्या ठिकाणी) अनेक प्रकारचे पुरावे, खुणा सुटलेल्या असतात. या खुणा किंवा पुरावे म्हणजे काहीही असू शकते, अगदी काहीही. जसे की – रंग, रक्त, माती, गुन्हेगाराची किंवा बळी गेलेल्या अज्ञात व्यक्तीची थुंकी, शारीरिक घटक, डिजिटल पुरावे, हाडं, कागदपत्रं, बोटांचे ठसे इत्यादी. गुन्हा ज्या ठिकाणी घडला, त्या ठिकाणी वर नमूद केल्याप्रमाणे असे कोणत्याही प्रकारचे पुरावे किंवा खाणाखुणा सापडल्या असतील, तर रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्र यांच्या सहाय्याने ते पुरावे शोधणं आणि त्यांचा आढावा घेण्याचे काम फॉरेन्सिक सायन्स करते. गुन्हेगाराला पकडून देण्यासाठी मदत करण्यात फॉरेन्सिक सायन्सचा वाटा मोठा आहे. त्याचबरोबर न्यायालयात या शास्त्रशुद्ध पुराव्यांच्या आधारे गुन्हेगारांना शिक्षा मिळवून देण्याचे कामही याच फॉरेन्सिक सायन्सच्या मदतीने होते, म्हणजेच न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळेची महत्त्वपूर्ण भूमिका ठरत आहे. महाराष्ट्रात पहिली न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा मुंबईत १९५८ साली सर जे.जे. रुग्णालयात सुरू करण्यात आली. आज राज्यात न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय येथे कार्यरत असून, सांताक्रूझ कलिना येथे त्याचे मुख्य कार्यालय आहे. न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय, महाराष्ट्र ही एक बहुशास्त्रीय संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, नांदेड आणि कोल्हापूर येथे सात प्रादेशिक न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि चंद्रपूर, धुळे, रत्नागिरी, ठाणे आणि सोलापूर येथे पाच लघू न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा आहेत. आंतरराष्ट्रीय मानकांच्या अतिविशिष्ट आणि तर्कसंगत पायाभूत सुविधांनी सुसज्ज अशी गुन्ह्याशी संबंधित कोणतीही आव्हानात्मक वैज्ञानिक कामे करण्यास या प्रयोगशाळा सध्या आहेत. संचालनालयामध्ये आयपीसी, सीआरपीसी, इंडियन आर्म्स ॲक्ट, एनडीपीएस ॲक्ट, स्फोटक पदार्थ कायदा, पेट्रोलियम कायदा, मुंबई पोलीस कायदा, अत्यावश्यक वस्तूंचा कायदा, मोटार वाहन अधिनियम, आयटी ॲक्ट, लाइफ प्रोटेक्शन ॲक्ट, टाडा, मकोका, वाईल्डलाईफ ॲक्ट इ. अशा विविध कायद्यांनुसार विविध गुन्हेगारी प्रकरणांचे विश्लेषण केले जाते.

गुन्हेगारीच्या घटनांमध्ये बदल होत असताना, फॉरेन्सिक लॅब गुन्हेगारी न्यायव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचे साधन बनले आहे. राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी सन २०१४ नंतर विशेष प्रयत्न झाले आहेत. त्यासाठी तांत्रिक पुरावे आणि न्यायसहाय्यक वैज्ञानिक पुराव्यांवर भर देण्यात आला आहे. भाजपप्रणीत सरकारच्या काळात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ वरून ५४ टक्क्यांपर्यंत यश मिळाले आहे. विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करताना गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण ९० टक्क्यांपुढे घेऊन जाण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यात आधुनिक सायबर न्यायसहाय्यक प्रयोगशाळा, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मोबाईल न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांची संख्या वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. नवी मुंबई येथे सायबर केंद्र उभारून त्याचे महामंडळात रूपांतर केले जाणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे गृहमंत्री असल्याने, गुन्ह्यांतील शिक्षेमधील प्रमाण वाढविण्यासाठी त्यांनी कल्पकतेने फॉरेन्सिक लॅबचा अधिकाधिक उपयोग करून या वर्षाअखेर प्रलंबित सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात न्यायसहाय्यक वैज्ञानिक व्यवस्थेचे कार्य न्यायदानात जमेची बाजू असणार आहे.

# वंदे भारत'ची मराठवाड्यात ठिणगी



जालना-मुंबई अशा धावणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेसचा विस्तार नांदेडपर्यंत करण्यात येणार आहे. देशाचे माजी रेल्वे राज्यमंत्री तथा मराठवाड्याचे नेते रावसाहेब दानवे यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. २८ ऑगस्टपासून ही रेल्वेसेवा नांदेडवरून सुरू होणार आहे; परंतु या विस्ताराला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून प्रचंड विरोध होत आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार ही रेल्वे जालना ते मुंबई या दरम्यानच असावी; परंतु नांदेडवरून ही रेल्वे सुटत असताना छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील प्रवाशांची प्रचंड गैरसोय होणार आहे. त्याचबरोबर या रेल्वेच्या वेळेवर फरक पडणार आहे. त्यामुळे मराठवाड्यात औद्योगिकदृष्ट्या अग्रेसर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील विकासकामांना खीळ बसेल, असे तेथील अनेकांचे म्हणणे आहे. 'वंदे भारत' रेल्वेसेवा सर्वच जिल्ह्यांना हवीहवीशी वाटणारी आहे. एकीकडे या विस्तारामुळे मराठवाड्यातील नांदेड व परभणी जिल्ह्यातील नागरिकांनी आनंदोत्सव साजरा केला; परंतु त्या आनंदावर विरजण पडावी अशीच घटना छत्रपती संभाजीनगरमधून समोर येत आहे. छत्रपती संभाजीनगरमधील नागरिकांच्या म्हणण्यानुसार नांदेडच्या राजकारणी मंडळींनी दबाव आणून ही रेल्वे पळवून नेली. नांदेड ते मुंबई हे ६०८ किलोमीटरचे अंतर वंदे भारत एक्स्प्रेसने ६४ किलोमीटर प्रति तास या गतीने ९ तास २५ मिनिटांत पूर्ण करणार आहे.

रेल्वेसेवेचा जेवढा विस्तार होईल तेवढा सर्वसामान्य जनतेबरोबरच देशालाही फायदा असतो. देशभरात अनेक रेल्वेंचा विस्तार करण्यात आला आहे. त्या विस्तारामध्ये वंदे भारतचाही समावेश आहे. मराठवाड्यात नांदेड या शेवटच्या जिल्हापर्यंत वंदे भारतचा विस्तार केल्यामुळे टोकाच्या नागरिकांना मुंबईला जाण्यासाठी कमी वेळेचा पर्याय उपलब्ध झाला आहे; परंतु ही सेवा छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना तसेच नागरिकांना गैरसोयीची ठरत आहे. अशी आरोळी ठोकून छत्रपती संभाजीनगर येथील नागरिकांनी या विस्ताराला विरोध दर्शवून दिल्ली गाठली आहे. प्रस्तावित नांदेड ते मुंबई वंदे भारत एक्स्प्रेसला नांदेड ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान वीस मिनिटांचा स्लॅक टाईम आहे. छत्रपती संभाजीनगर ते नाशिक दरम्यान तीस मिनिटांचा तर नाशिक ते मुंबई दरम्यान पुन्हा ३० मिनिटांचा असा एकूण जवळपास दीड तासांचा अनावश्यक स्लॅक टाईम कमी केल्यास नांदेड-मुंबई हा रेल्वे प्रवास केवळ आठ तासांत शक्य होऊ शकतो. दक्षिण मध्य रेल्वेने या स्लॅक टाईमवर विशेष लक्ष दिल्यास नांदेडवरून सकाळी ५ वाजता निघणारी वंदे भारत मुंबईला दुपारी १ वाजता पोहोचू शकते व छत्रपती संभाजीनगर तसेच जालना जिल्ह्यातून होत असलेला विरोध यामुळे संपू शकतो, असे रेल्वे खात्यातील काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

मराठवाड्याचे भाजपचे नेते तथा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या जालना जिल्ह्यातून ही रेल्वे सध्या सकाळी ५ वाजता सुटत आहे. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी पावणेसहा वाजता ही रेल्वे मुंबईसाठी रवाना होते. मनमाड-नाशिक रोड-कल्याणमार्गे ठाणे-दादर व त्यानंतर मुंबईला ही रेल्वे सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांना पोहोचते. ही रेल्वे १२ बाराच्या अगोदर मुंबईला पोहोचत असल्यामुळे त्याचा फायदा जालना व छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजकांना तसेच सर्वसामान्य नागरिकांना होतो; परंतु या रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार होत असल्याने ही रेल्वे सकाळी ५ वाजता नांदेडवरून सुटेल व दुपारी अडीच वाजता मुंबईला पोहोचेल या सर्व प्रस्तावित बदलामुळे जालना व छत्रपती संभाजीनगर येथील नागरिकांचा ताळमेळ मुंबईला ये-जा करण्यासाठी बसणार नाही. यामुळे तेथून या विस्ताराला प्रचंड विरोध होत आहे. तसे पाहिले तर नांदेडवासीयांसाठी वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होऊन देखील फायद्याची ठरणार नसल्याचे चित्र दिसत आहे. ही वंदे भारत सध्या आठ डब्यांची आहे; परंतु पुढील ऑगस्ट महिन्यात नांदेडवरून जेव्हा ही रेल्वे धावणार आहे, त्यासाठी त्याला बारा अतिरिक्त डबे जोडून ही वंदे भारत २० डब्यांची असणार आहे. नांदेड ते पूर्णा जंक्शन हे अंतर केवळ अर्ध्या तासाचे आहे व पूर्णा येथून दररोज सकाळी पावणेसहा वाजता मुंबईला जाणारी शताब्दी एक्स्प्रेस दुपारी साडेतीन वाजता मुंबईला पोहोचते.

हिंगोली ते मुंबई अशी धावणारी शताब्दी एक्स्प्रेस नांदेडवासीयांना देखील सोयीची असताना सकाळच्या वेळेतच वंदे भारत या रेल्वेला नांदेडपर्यंत का वाढविले? अशी विचारणा जालना व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून होत आहे. याच वंदे भारतमुळे छत्रपती संभाजीनगर व नांदेड या दोन जिल्ह्यांत वादाची ठिणगी पडली आहे. या दोन्ही जिल्ह्यांतील उद्योजक तथा नागरिक संबंधित पुढाऱ्यांना प्रश्न विचारून तसेच सोशल मीडियावर याबाबत चर्चा करून नेत्यांना टार्गेट करत आहेत. वंदे भारत नांदेडपासून सुरू व्हावी यासाठी माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान खासदार अशोक चव्हाण, नांदेडचे काँग्रेसचे खासदार रवींद्र चव्हाण, परभणीचे खासदार बंडू जाधव, खासदार अजित गोपछडे यांनी दिल्ली दरबारी पाठपुरावा केला; परंतु या सर्व राजकीय मंडळींना दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत तेलंगणात असलेली निजामबाद ते तिरुपती धावणारी रॉयलसीमा एक्स्प्रेस नांदेडपर्यंत आणता आली नाही; परंतु मराठवाड्यातीलच राजधानीची एक्स्प्रेस नांदेडकरांनी पळविली. अशा शब्दात नांदेडच्या नेत्यांवर मराठवाड्यातून विशेषतः छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातून टीकेची झोड उठत आहे. रॉयलसीमा एक्स्प्रेस ही तिरुपतीला जाण्यासाठी नांदेडकरांना अतिशय उपयुक्त रेल्वे ठरू शकते; परंतु तेलंगणातील खासदार कुठल्याही परिस्थितीत सदरील रेल्वे नांदेडपर्यंत जाऊ द्यायला तयार नाहीत व या रेल्वेचा नांदेडपर्यंत विस्तार व्हावा या दृष्टीने नांदेडची नेतेमंडळी प्रयत्नात कमी पडत आहे, हे वास्तव आहे.

**रेल्वे सेवेचा बोजवारा**

अगोदरच मराठवाड्यात रेल्वेसेवेचा बोजवारा उडालेला आहे. दक्षिण मध्य रेल्वे अंतर्गत नांदेडला रेल्वेचे डीआरएम ऑफिस आहे. या ठिकाणाहून तेलंगणा व कर्नाटक या दोन राज्यांना जोडणाऱ्या रेल्वे सुरू असतात; परंतु महाराष्ट्राची राजधानी असलेल्या मुंबईसाठी नांदेडवरून आणखी स्वतंत्र रेल्वेची नितांत गरज आहे. याबरोबरच मराठवाड्यातील नागरिकांसाठी पुण्याला जाण्यासाठी सोयीच्या वेळेत रेल्वेसेवा हवी आहे. सध्या मराठवाड्यातून पुण्याला जाण्यासाठी असलेल्या रेल्वेच्या वेळेबाबत प्रवासी वर्गाची प्रचंड तक्रार आहे. एकीकडे तेलंगणाची राजधानी असलेल्या हैदराबादला नांदेडवरून १५ पेक्षा अधिक रेल्वे धावतात; परंतु त्या तुलनेत महाराष्ट्राच्या राजधानीला म्हणजेच मुंबईला जाण्यासाठी नेहमीच रेल्वे तिकिटांचा तुटवडा असतो. या बाबीकडे रेल्वे खात्याने तसेच मराठवाड्यातील पुढाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे; परंतु हे करण्याऐवजी मराठवाड्यातील नेतेमंडळी वंदे भारतवरून एकमेकांवर आगपाखड करण्यात धन्यता मानत आहेत. कोरोना काळात बंद करण्यात आलेली मुंबईहून नागपूरपर्यंतची नंदिग्राम एक्स्प्रेस अद्यापही नागपूरपर्यंत धावत नसल्याने त्याबाबत मराठवाड्यातील नेतेमंडळी मूग गिळून गप्प का बसले आहेत, असाही प्रश्न प्रवासी वर्गातून उपस्थित होत आहे.

# महिलांसाठी एखाद्या टॉनिकपेक्षा कमी नाहीये ॲपल सिडार व्हिनेगार



ॲपल सिडार व्हिनेगार हे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. ॲपल सिडार व्हिनेगारच्या एका चमच्याने महिलांच्या अनेक समस्या दूर होतात. वेट लॉसपासून ते याचा वापर अनेक आजारांमध्ये केला जातो. हृदयासारख्या भयंकर आजारांसाठी हे अतिशय फायदेशीर आहे. ॲपल सिडार व्हिनेगारचा वापर तुम्ही सरळ करू शकत नाही एखाद्या गोष्टीसोबत याचा वापर केला जाऊ शकतो. त्वचेला चमक आणणे, केसांमधून कोंडा घालवणे याशिवाय लठ्ठपणा दूर करण्यास ॲपल सिडार व्हिनेगारचा वापर होतो.

**वजन कमी करण्यात फायदेशीर**

आजकाल लठ्ठपणा ही सामान्य समस्या बनत चालली आहे. ॲपल सिडार व्हिनेगार या समस्येपासून सुटका मिळवण्याचा एक नैसर्गिक आणि फायदेशीर उपाय आहे. यातील ॲसिडिक गुण वजन कमी करण्यात फायदेशीर ठरतात. पोटाची चरबी कमी होण्यास मदत होते. तसेच भूक कमी करून ओव्हरइंटिंगपासून वाचवतात.सोबतच मेटाबॉलिज्म वाढवून वजन घटवण्यात फायदेशीर ठरतात.

**पचनासाठी फायदेशीर :** आजकालच्या व्यस्त जीवनशैली आणि अनियमित खाण्या-पिण्याच्या सवयीमुळे अनेकांना पचनासंबंधित आजार सतावतात. बद्धकोष्ठता, ॲसिडिटी, गॅससारख्या समस्या सतावतात. ॲपल सिडार व्हिनेगारमधील पेक्टिन आणि ॲसिड पाचन शक्ती वाढवतात. यामुळे पोट साफ राखण्यास मदत होते.

**त्वचेसाठी फायदेशीर :** ॲपल सिडार व्हिनेगारमध्ये एल्फा हायड्रोक्सी ॲसिड असते हे चेहऱ्यावर लावल्याने चेहरा स्वच्छ आणि चमकदार बनतो. त्वचेवरील डेड स्किन हटवून नवी त्वचा आणतात. ॲपल सिडार व्हिनेगार चेहऱ्यावर लावल्याने हळूहळू डाग दूर होतात तसेच त्वचा मुलायम आणि चमकदार बनते.

**हृदयरोगासाठी अतिशय फायदेशीर :**ॲपल सिडार व्हिनेगारमधील फायबर हृदयासाठी अतिशय फायदेशीर आहे. कारण हे हृदयवाहिनीच्या रोगांचा धोका कमी करतात.

# रक्तवाढीसाठी आसन करा



असं आवश्यक नाही की शरीरात रक्ताचे प्रमाण वाढविण्यासाठी आपण नेहमी औषधांवर अवलंबवून राहावे. चांगले पौष्टीक आणि सकस आहार आणि नियमितपणे योगा केल्याने देखील आपण शरीरातील रक्त वाढवू शकता. आपल्या शरीरात रक्ताच्या कमतरतेला योगाच्या साहाय्याने पूर्ण करू शकतो.चला जाणून घ्या.कोणते आसन केले पाहिजे. ✻ ताडासन- ताडासन केल्याने शरीरात रक्तविसरणं चांगले होते.म्हणून ज्यांच्या शरीरात रक्ताची कमतरता आहे,त्यांनी हे आसन नियमितपणे करावे.हे आसन करायला सोपे आहे.हे कोणीही करू शकतो.आसन योग सुरु करण्याच्या पूर्वी किंवा शेवटी करावे.या आसन मध्ये घेतल्या जाणाऱ्या श्वासोच्छ्वासामुळे रक्तविसरणं सुधारते.✻ सर्वांगासन- सर्वांगासन केल्याने देखील रक्त वाढते.हे आसन केल्याने शरीरातील सर्वांगाचा चांगला सराव होतो .पाठीचा कणा बळकट करण्यासाठी देखील हे आसन लोक करतात.हे आसन नियमितपणे केल्याने शरीरातील कार्यप्रणालीमध्ये सुधारणा होते.म्हणून हे आसन नक्की करा.✻ शशांकासन-या आसनाचा सराव केल्याने सम्पूर्ण शरीर ताणले जाते,हे मेंदूला देखील शांत ठेवतो.हे आसन केल्याने रक्तविसरणं चांगले होते.आसन करताना लक्षात ठेवा की आपल्या सामर्थ्यानुसारच शरीराला पुढे ताण द्या.

# मेडिटेशन

पूर्वी देवांची पूजा झाल्याशिवाय तोंडात पाणीही न घेणारी लोकं होती. त्याची आठवण झाली.

मग विचार करता करता वाटलं किती सुंदर पद्धत आहे ना आपल्यात रोजच्या पूजेची. माझ्या डोळ्यांसमोर पूर्वीचं एक छान चित्र ऊभं राहिलं. भल्या पहाटेच ऊठून सर्व स्त्रिया घरातलं दळण, स्वैपाकघरातली कामं, पाणी भरणं, लहान मुलांकडे लक्ष देणं वगैरे कामात मग्न असताना पुरूष मंडळी बाहेरच्या अंगणाची सफाई, चूल पेटवणं, बागेला पाणी देणं, गोठा सफाई, धारा काढणं वगैरे कामात गर्क आहेत.

सकाळची सर्व आन्हिकं ऊरकून शूचिर्भूत होऊन घरातले यजमान पूजेसाठी फुलं काढायला बागेत जातात. ऊगवतीची कोवळी किरणं अंगावर घेत, अनवाणी पायांनी, रंगीबेरंगी फुलांची शोभा निरखत पानाफुलांशी हितगूज करत निसर्गाचं अप्रूप मनात साठवत मनाला आल्हाददायक देणारा एक आनंददायी (आणि आरोग्यदायीही) सुंदर अनुभव.

फुलं घेऊन देवघरात आल्यावर सर्व देव (स्वत:) स्वच्छ घासलेल्या ताम्हनात काढून देवघराची स्वच्छता, देवांची ऊन पाण्याने अंघोळ, त्यांना लहान बाळांच्याच ममतेने आणि कोमलतेने (भक्तीने) स्वच्छ करून परत जागच्याजागी स्थानापन्न करतात. एकतानतेने सहाणेवर चंदनाचं मऊ मुलायम सुगंधी गंध ऊगाळतात. तुम्हाला तुमच्या चिंता, क्लेश, दु:ख, दैन्य सारं सारं काही विसरायला लावणारा हा अनुभव. खऱ्या भक्तीभावनेत तल्लीन होऊन पूजा करताना 'तो' आहे माझ्या पाठीशी, हेही दिवस जातील, 'तो' समर्थ आहे, मी कशाला ऊगीच काळजी करू किंवा कशाला काही त्याच्याकडे मागू असा सार्थ विश्वास मनात जागतो.

चंदनाच्या गंधाचा मऊ स्पर्श, फुलांचे देखणे रंग आणि प्रकार, धूपाचा सुगंध, तेजाळलेले दिवे, वाहिली जाणारी अक्षत, दाखवला जाणारा नैवेद्य म्हणजे जणू टप्याटप्याने रंगत जाणारी महफिल. ही पूजा पूर्ण केल्यानंतर ते सजलेलं, तेजाळलेलं, सुगंधित देवघराचं रूप डोळे भरून मनात साठवून डोळे मिटावेत आणि असा सुंदर दिवस दाखवल्याबद्दल त्या ईश्वराप्रती कृतज्ञता व्यक्त करावी. अशी ही साग्रसंगीत पूजा म्हणजे रस, रंग, गंध, स्पर्श या सर्व इंद्रियांद्वारे केली जाणारी साधनाच जणू. यात नादही येतोच की. तुमचं मन जराही भरकटू नये आणि ईश्वरावर अढळ निष्ठा ठेवून समर्पित व्हायला मदत म्हणून धीरगंभीरपणे म्हटली जाणारी स्तोत्रं.

खरोखरच तुम्हाला सर्व नकारात्मक भावना विसरायला लावणारी. सकारात्मक भाव जागवून तुम्हाला सात्विक बनवणारी. तुम्हाला जास्त प्रेमळ, करूणामय आणि क्षमाशील बनवून तुम्हाला आत्मविश्वास प्रदान करणारी.

मी तुझ्या पाठीशी आहे. सर्व काही ऊत्तमच होईल' असा भक्कम विश्वास देऊ करणारी. हळूहळू तुमच्यातला 'अहं' विसरायला लावणारी....

अशी ही रोजची पूजा.

ही बहुधा प्रत्येकाने स्वतंत्रपणे आपापली करणे अपेक्षित असेल का?या वेळेस अंतर्मुख होऊन मौन राखून रोज परमेश्वराशी अद्वैत साधण्याचा प्रयत्न असेल का?

यात अमुक फुलं आहेत किंवा नाहीत म्हणून, चंदनाचं गंध हवं तसं किंवा हवं तितकं नाही म्हणून, मनासारखा नैवेद्य नाही म्हणून तुम्हाला राग येत असेल तर किंवा पूजा करताना तल्लीनतेने न करता मनात बाकीचे विचार किंवा इतरत्र लक्ष असेल तर मंडळी या पूजेचा तुम्हाला काही ऊपयोग होईल का?पूजा ही कुणा बाहेरच्या 'देवाला' प्रसन्न करून घेण्यासाठी नाहीये, तर स्वत:मधील ईश्वराची अनुभूती घेण्याचा तो एक प्रवास आहे. स्वतःला प्रसन्न ठेवण्यासाठी आहे. दिवसाची सुरूवात सकारात्मक ऊर्जेने आणि ऊत्साहाने करायचा तो एक सहजसोपा आणि सुंदर मार्ग आहे.


# काळ्या मिठाचे ५ चमत्कारी फायदे

काळ मीठ हे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते.हे केवळ अन्नाची चवच वाढवत नाही तर औषध म्हणूनही कार्य करते. त्यात असणारे खनिज हाडे मजबूत करतात. याच्या सेवनाने पोटाशी संबंधित आजारांमध्येही आराम मिळतो. चला आज आम्ही काळ्या मिठाचे सेवन करण्याचे फायदे सांगत आहोत जाणून घ्या.

१ बद्धकोष्ठते आणि पोटफुगीपासून आराम देतं-जर आपल्याला अपचन, गॅस,ॲसिडिटी, बद्धकोष्ठतेचा त्रास आहे.तर आपण काळ मीठ आवर्जून खावे.यामुळे त्वरीतआराम मिळेल.मळमळ होत असल्यास काळ मीठ खावं लवकर आराम मिळतो.एका संशोधनानुसार वेगवेगळ्या आयुर्वेदिक चूर्ण मध्ये देखील काळ मीठ वापरतात.काळ्या मिठात असलेले लक्सेटीव्ह गुणधर्म पोटाच्या समस्ये मध्ये आराम देतं.

२ वजन कमी करण्यात -साधारण मिठात सोडियम जास्त प्रमाणात असतो.जे आपल्या आरोग्यासाठी हानिकारक आहे.याचा जास्त वापर केल्याने हाड गळण्याचा धोका जास्त प्रमाणात असतो.म्हणून आपल्या आहारात काळ मीठ वापरावे.नॅशनल सेंटर फॉर बायोटेक्नॉलॉजीच्या माहितीनुसार,खाण्यात जास्त सोडियम घेतल्याने लठ्ठपणा अधिकच वेगाने वाढतो. म्हणून आहारात काळे मीठ वापरावे.काळ्या मीठात सोडियमचे प्रमाण कमी असते.

३ स्नायूमध्ये आराम मिळतो-



इलेक्ट्रोलाइट्सच्या अभावामुळे स्नायूमध्ये वेदना होते.इलेक्ट्रोलाइट्स मध्ये मॅग्नेशियम,कॅल्शियम आणि पोटॅशियम असतात. याची मात्रा काळ्या मीठात आढळते. वेदना आणि अंगाची समस्या काही प्रमाणात काळ मिठाच्या वापराने कमी केली जाऊ शकते.

४ कफाचा त्रास-कफाचा त्रास होत असल्यास काळ्या मिठाचा खडा तोंडात ठेऊन त्याचा रस चघळत राहा.असं केल्यावर २ तास काहीच खाऊ पिऊ नका.कफाच्या त्रासात आराम मिळेल.५ मुलांना काळ मीठ द्या- काळ मीठ आरोग्याच्या दृष्टीने चांगले आहे.कारण या मध्ये सोडियमचे प्रमाण कमी आहे. मुलं हे सहज खाऊ शकतात.एका संशोधनानुसार,मुलांना जास्त मीठ खायला देऊ नये.परंतु काळ मीठ आपण देऊ शकतो.हे फायदेशीर आहे. हृदयाचा कोणताही आजार होऊ नये म्हणून साध्या मिठा ऐवजी काळ मीठ देणं फायदेशीर आहे.

## विशेष वृत्त

### शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्थापनात समुदाय सहभाग महत्त्वाचा: डॉ. वाघमारे

**बीड :** शास्वत पाणीपुरवठा व्यवस्थापनात समुदाय सहभाग महत्वाचा असतो, असे प्रतिपादन डॉ. संतोष वाघमारे यांनी केले. महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग राज्य पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा परिषद बीड व केआरसी स्टुडंट्स रिलीफ सोसायटी जयपुर राजस्थान यांचे संयुक्त विद्यमानाने दि.१४ जुलै रोजी सकाळी दहा वाजता येथील स्वातंत्र्य सेनानी रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय सभागृहात दोन दिवसीय स्त्रोत बळकटीकरण व शाश्वतीकरण प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वाघमारे बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. शाहिस्ता सलीमखान इनामदार या होत्या. तर प्रमुख मार्गदर्शक डॉ. संतोष वाघमारे, राम किशोर बैरवा, मिथिलेश कुमार विचार मंचावर उपस्थित होते. यावेळी प्रवीण प्रशिक्षक माधव भदेवाड, श्रीकन्या जाधव, संगीता राऊत, अंजली ढवळे, डॉ गणेश खेमाडे, उपस्थित तर संकेत गायकवाड गणेश माने अक्षय वडमारे, यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, पाणीपुरवठा कर्मचारी, आशा स्वयंसेविका, जलसुरक्षक उपस्थित होत्या.

### सारिका मिरगे यांची महसूल सहाय्यकपदी निवड




**सिरसाळा :** येथील सारिका ज्ञानोबा मिरगे या विद्यार्थिनीची एमपीएससीच्या परिक्षेमार्फत महसुल सहाय्यकपदी निवड झाली आहे. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अकबर पठाण, आसेफ सय्यद, मस्तान सय्यद, जावेद पठाण आदी उपस्थित होते. अंत्यत सामान्य कुटुंबातील सारिका मिरगे ही गेल्या काही वर्षांपासून स्पर्धा परिक्षेची तयारी करत होती. यापुर्वी अनेक परिक्षा दिल्या मात्र यश मिळाले नाही. सारिकाने प्रयत्न सोडले नाही. आभ्यासात सातत्य ठेवले, अखेर प्रयत्नास यश मिळाले.

### माजलगाव येथे चातुर्मासाचा शुभारंभ

**माजलगाव :** माजलगाव शहरात प.पू. पद्मऋषीजी म.सा. व प.पू. शालीभद्र म.सा. यांच्या पावन सानिध्यात चातुर्मासाचा शुभारंभ झाला आहे. या पवित्र चातुर्मास काळात दररोज विविध आध्यात्मिक विषय व जीवन शैलीवर आधारित प्रवचन तसेच विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या संपूर्ण चातुर्मास काळात प.पू.गुरूमहाराजांच्या ज्ञानमय प्रवचनांचा लाभ घेता येणार असून, त्यांच्या मंगल दर्शनाने भक्तगणांना आत्मिक शांती व आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव भाविकांनी प्रवचनाचा लाभ घ्यावा मिळणार आहे. या पर्वाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन स्थानिक जैन संघटनेकडून करण्यात आले आहे. भाविकांनी दररोज आयोजित होणाऱ्या प्रवचनांना उपस्थित राहून धर्म, संयम व साधनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माजलगाव शहरातील मठ गल्ली भागात असणाऱ्या जैन स्थानक येथे दररोज सकाळी ८:४५ ते ९:४५ वेळेत प्रवचनाचे आयोजन केलेले आहे. तरी परिसरातील, तसेच सर्व समाजातील भाविक-भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### बीड पंचायत समितीचे बीडीओ म्हणून गणेश मोरे यांची नियुक्ती

**बीड :** बीड पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी पदावर गणेश बी. मोरे यांची नियुक्ती झाली आहे. मोरे यांनी धुळे जिल्ह्यातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) म्हणून काम केलेले आहे. तेथून त्यांची बीडमध्ये बदली करण्यात आली. ग्रामविकास विभागाने १५ जुलै रोजी यासंदर्भातील आदेश जारी केला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून या पदाचा अतिरिक्त कार्यभार वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे दिला जात होता. परिणामी, विविध योजनांचे लाभ, अनुदाने, मंजुरी प्रक्रिया आणि फाइलचा प्रवास वेळेवर न होण्यामुळे अनेक लाभार्थ्यांची कामे रखडली होती. स्थानिक स्तरावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. मोरे यांच्याकडे यापूर्वीही प्रशासकीय अनुभव असून, त्यांच्या नव्या नियुक्तीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये आणि लाभार्थ्यांमध्ये आशा निर्माण झाली आहे की, रखडलेली कामे वेगात मार्गी लागतील आणि विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### खरीप हंगामात पावसाने फिरवली पाठ पिके सुकू लागली, शेतकरी चिंतातूर

**पिंपळनेर :** बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरात मे महिन्यात जोरदार पावसाचे आगमन झाल्याने शेतकऱ्यांनी खरिपाची तयारी करत १ हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी तसेच लागवड केली. मात्र मागील २० ते २५ दिवसांपासून पावसाने पाठ फिरवली असुन आढे वेढे घेण्यास सुरुवात केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. आगामी काही दिवसात पाऊस न झाल्यास खरीप धोक्यात येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खरिपाची पेरणी केली. मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. शेतकऱ्यांनी चालू वर्षी हवामान खात्याच्या अंदाजानुसार समाधानकारकरीत्या पाऊस पडेल, या भरवशावर शेतकऱ्यांनी जमिनीच्या मशागती करत कपाशी, बाजरी, उडीद, सोयाबीन इत्यादी बियाणे खरेदी करून सुमारे १ हजार ६० हेक्टर क्षेत्रावर लागवड व पेरणी केल्या. मात्र मागील २० ते २५ दिवसांपासून पावसाने आढे वेढे घेण्यास सुरुवात केल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. आगामी आठ दिवसात पाऊस न झाल्यास खरीप धोक्यात येण्याची शक्यता वर्तविली जात असून शेतकऱ्यांची नजर आता आकाशाकडे लागले असून, आता या पिकांना पावसाची नितांत गरज निर्माण झाली आहे. फळबाग शेतकरी देखील चिंतेत आला आहे.

# विद्यार्थ्यांनो, गरज म्हणून अभ्यास करा- तहसीलदार राजेश गिड्डे

## साने गुरुजी निवासी विद्यालयात गणवेश वितरित



**केज (प्रतिनिधी):-** येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात तहसीलदार राजेश गिड्डे यांच्या हस्ते निवासी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनो शिक्षण घेत असताना गरज म्हणून शिक्षण घ्या त्याला ऐच्छिक समजू नका शिक्षण हे ऐच्छिक नसते ती गरज वाटली पाहिजे गरज वाटते तेव्हाच माणूस यशाची शिखरे पादाक्रांत करत असतो. शिक्षण घेत असताना तीन गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत त्या म्हणजे मार्गदर्शन, खरं बोलणे, परिश्रम घेणे या होत. योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास यश निश्चित असते फक्त त्यासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवली पाहिजे व त्याचबरोबर खरं सुद्धा बोलणं तेवढंच महत्त्वाचं आहे. शिक्षणाबरोबर खेळाची सुद्धा तितकीच गरज आहे खेळ सुद्धा खेळले पाहिजेत मी शालेय जीवनात सतत क्रिकेट खेळत होतो एक वेळेस शाळा बुडवून क्रिकेट खेळल्याने वडिलांनी शाळा बंद केली आणि मग मी मात्र आईला कन्व्हिन्स करून पुन्हा शाळेत गेलो व पुन्हा कधीच अशी वेळ येऊ दिली नाही की त्यांनी मला शाळेत जा म्हणावं हा अनुभव देखील विद्यार्थ्यांसोबत आदरणीय साहेबांनी शेअर केला. आणि आणखीनही खेळतो पण गरज म्हणून अभ्यासाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे. तसेच शाळेत येताना नीटनेटकेपणाने व व्यवस्थित तयारीने यावे जर आपण कोणत्याच बाबतीत सक्रिय नसू तेव्हा कोणीही शिक्षक आपल्याला वाहवा देत नाही चांगले हुशार असेल तर शिक्षक सुद्धा आपल्याला प्रेरित करतात. हे त्यांनी स्वतःचेच उदाहरण देताना सांगितले. मी केज ला आलो तेव्हा मला असे वाटले की आता मी या नवीन ठिकाणी आलो पण ज्या वेळेस केज मधीलच काही विद्यार्थी माझे स्पर्धा परीक्षेतील सोबती आहेत हे लक्षात आल्यावर इथे सुद्धा मोठ्या प्रमाणात टॅलेंट आहे याची जाणीव मला झाली आणि केज मध्ये आल्याचा आनंद देखील झाला. त्याचबरोबर अध्यक्षीय भाषणात बोलत असताना बद्दल प्रशासकीय अधिकारी कसा असावा याचे एक उदाहरण देऊन साहेबांचा आदर करत अशाच प्रशासकीय अधिकाऱ्याची सध्याला गरज आहे असे गौरव उद्गार काढले. तर विद्यार्थ्यांना आपली परिस्थिती बदलायची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही शिक्षणात सर्व काही बदलू शकतो असे सांगितले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या प्राचार्य डॉ. कविता कराड यांनी केले तर सूत्रसंचालन श्री चोले सर यांनी केले. प्रतिनिधी स्वरूपामध्ये काही विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करून साहेबांनी पुन्हा विद्यार्थ्यांसोबत सह भोजनास येण्याची अपेक्षा व्यक्त करत कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक बंधू भगिनी उपस्थित होते.

### पावसासाठी महिलांचा अखंड राम नाम जप

**धोंडराई (प्रतिनिधी):-** गायब गेल्या दीड महिन्यापासून असलेल्या पाऊस सर्वत्र पडावा यासाठी गेवराई तालुक्यातील भोजगाव येथील जगदंबा देवी संस्थान येथील मंदिरामध्ये महिलांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने रामनामाचा जप अखंडपणे २४ तास चालू आहे. या जपामुळे या परिसरामध्ये भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. या अखंड रामनाम जपाची सांगता गुरुवार दि. १७ रोजी होणार असून या सांगतेला महिलांच्या माध्यमातून त्यांनी जमा केलेल्या वर्गणीतून उपस्थित भाविकांना महाप्रसाद आयोजन केला आहे. येथील असलेले महंत रघुनाथ महाराज निंबाळकर यांच्या काल्याचे किर्तन आयोजन केला आहे. परिसरातील भाविकांनी या कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन महिलांनी केले आहे. गेल्या एक दीड महिन्यापासून एकही पाऊस न झाल्यामुळे लागवडी केलेल्या कापूस व पेरणी केलेले तुर, मूग हे उगवून आले आहे तर त्याला आता पुरेसे पाणी नसल्यामुळे त्याची वाढ खुंटली आहे. पाऊस पडण्यासाठी या महिलांनी वरून राजाला साखड घातला आहे.

### जिद्द, परिश्रमातून जिल्हयाचे नाव उज्वल करा : जिल्हाधिकारी



**बीड (प्रतिनिधी):** स्पर्धा परीक्षेचा प्रवास व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तरूणांच्या ध्येयपूर्तीसाठी स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन निश्चित जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येईल. तरी देखील प्रत्येकाने स्पर्धा परीक्षेत, यासह जीवनात यश संपादन करण्यासाठी स्वतःचे स्पष्ट ध्येय ठेवावे. जिद्द व परिश्रमातून आपल्या कुटुंबीयांसह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तरूणांना केले.

स्पर्धा परीक्षा तयारीत विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (दि.१४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन झाले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात परीविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा पवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेले उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीकृष्णकुमार बाहेती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, राजेश सुपेकर, महादेव चौरे, दादासाहेब शेळके आदी उपस्थित होते. पवार यांनी स्वानुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. स्वप्नांचा पाठपुरावा, नैतिक मूल्यांची जाणीव आणि अभ्यासातील शिस्त या विषयांवर मार्गदर्शन केले. यशाचा प्रवास, अडचणींवर मात करण्याचे तंत्र, अभ्यासाचे नियोजन, वेळ व्यवस्थापन, परीक्षा तयारीतील सकारात्मक आणि नकारात्मक टप्पे याबाबत श्री. बाहेती यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नैतिक मुल्ये, कौटुंबिक आणि सामाजिक समतोल याबाबतही विचार मांडले. कार्यक्रमातील संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक आणि उपप्रादेशिक अधिकारी यांनी केले. अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे आणि शरद घोडके यांनी केले. आभार जाधवर यांनी मानले.

## होमिओपॅथी डॉक्टरांच्या न्याय मागण्यांसाठी आज पासून आंदोलन

### बीड जिल्ह्यातून २५० डॉक्टर आझाद मैदानाकडे रवाना : डॉ. बंड

**बीड (प्रतिनिधी):** होमिओपॅथ डॉक्टरच्या सि. सी.एम.पी. कोर्सची एम.एम.सी. कडे नोंदणी करणे, होमिओपॅथ डॉक्टरांना शासकीय सेवेत रुजू करून घेणे, तसेच त्याना शिक्षण चालू असताना सवलती देणे यासह अन्य मागण्यांसाठी बुधवार (दि. १६) पासून मुंबई येथील आझाद मैदानावर उपोषण करण्यात येणार असून या आंदोलनासाठी बीड जिल्ह्यातून २५० पेक्षा अधिक बीड जिल्ह्यातून २५० डॉक्टर आझाद मैदानाकडे रवाना : डॉ. बंड डॉक्टर मुंबईकडे रवाना झाल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र बंड यांनी दिली. सरपंच आरक्षण सोडत बैठक होमिओपॅथी संघटनेच्या वतीने दिवसांपासून आपल्या डॉक्टर काही न्याय हक्काच्या मागण्यांसाठी लढा सुरू आहे. मागील आठवड्यात जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत शासनाकडे निवेदन देवून आझाद मैदानावरील आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. तरीही शासनाने कोणतीही दखल न घेतल्याने बुधवार दि. १६ पासून संघटनेच्या वतीने राज्यभरातील डॉक्टर मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू करणार आहेत. त्यासाठी बीड जिल्ह्यातून जिल्हा अध्यक्ष डॉ. राजेंद्र बंड, डॉ. ठोकरे, डॉ काळे गणेश, डॉ राजपुरे, डॉ खरसाडे, डॉ वरूनगळे, डॉ होणंराव, डॉ चव्हाण, डॉ पदमुले, डॉ. चोले, डॉ. जवरे, डॉ. कृष्णा राऊत, डॉ. धनवडे, डॉ. जगताप, डॉ. रोहित राऊत, डॉ. नेहरकर, डॉ. जितीन वंजारे, डॉ. भोंडवे, डॉ. आंधळे, डॉ. खेडकर, डॉ. गवारे, डॉ. रमेश शिंदे, डॉ. सुहास धुमाळ, डॉ. साळुंके नाथापूर, डॉ. अरडे, डॉ. गायके सह शेकडो डॉक्टर आंदोलन मध्ये सहभागी होण्यासाठी रवाना झाल्याची माहिती होमोओपॅथिक डॉ राजेंद्र बंड यांनी दिली आहे.

### श्री सिद्धी विनायक गणपती मंदिर यशवंतनगर येथे गायत्री महायज्ञ संपन्न



**बीड (प्रतिनिधी):-** गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने व अध्यक्ष ड मंगेश पोकळे साहेब याच्या सहकार्याने दिनांक १४/०७/२०२५ सोमवार आषाढ वद्य संकट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. पर्जन्य आहुती गेल्या दिड महिन्यापासून पाऊस नाही, शेतकरी हवालदिल झाला आहे. सर्वजण पावसाची वाट पहात आहेत, या वेळी वरुण राजासाठी पर्जन्य आहुती देण्यात आली. भरपूर पाऊस पडावा म्हणून साकडे घालण्यात आले. या आजच्या गायत्री महायज्ञास यशवंत नगर येथील असंख्य भावीक भक्त हजर होते यामध्ये मंदिराचे अध्यक्ष ड मंगेश पोकळे साहेब, श्री सतीशजी पोकळे, सौ रेवती पोकळे, डॉ केशवदास वैष्णव, वाल्मीक चाटे, मेढे साहेब, मुंढे, साईनाथ दुधाळ, उबाळे महाराज, म्हत्रे, चाटे साहेब, महावीर बोरा, भराटे साहेब, गिराम नाना यांच्या सह भाविक उपस्थित होते या गायत्री महायज्ञ चे यजमान संजय शेषराव भालशंकर हे होते तर कार्यक्रमाचे पौरोहित्य रत्नपारखी काका, मोहन महाराज खरमाटे यांनी केले कार्यक्रमात विलास लेंबे, मुकुंद भुतपल्ले, महादेव (नाना) साळुंके यांनी परिश्रम घेतले शेवटी आरती करण्यात आली व प्रसाद वाटप करण्यात आला.

### प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत


**बीड:** मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी १५ ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीमध्ये अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्यावतीने करण्यात आले आहे. माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय, आयटीआय, तंत्रनिकेतन आदी ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश दिला जातो. मागील वर्षात वसतीगृहात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्प्रवेशासाठी ६० टक्के गुण आवश्यक आहेत. प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जुलै, २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्ट्या वगळता) सादर करावेत. त्रुटी असलेले, अपूर्ण अर्ज व अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, असेही वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी कळविले आहे.

## देवगिरी प्रतिष्ठानतर्फे डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त होणार शालेय, वक्तृत्व स्पर्धा

### राज्यभरातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-प्रा. प्रदीप रोडे

**बीड (प्रतिनिधी):-** येथील देवगिरी प्रतिष्ठाणच्यावतीने साहित्यसम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राज्यस्तरीय शालेय व महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले असून, यंदाचे हे १६ वे वर्ष आहे. ही स्पर्धा रविवार, ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता बीड येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, आदर्श नगर, डी.पी. रोड येथे भव्य स्वरूपात पार पडणार आहे.

या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत शालेय इ.८वी ते १२वी कनिष्ठ आणि महाविद्यालयीन पदवी व पदव्युत्तर वरिष्ठ असे दोन गट असतील. वरिष्ठ गटासाठी विषय संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये वादाबाबत साठे यांचे मार्गदर्शन व योगदान, अण्णाभाऊ साठे यांची आंबेडकर भूमिका आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवतावाद हे असून कनिष्ठ गटासाठी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मानवी कल्याणाचे मार्गदर्शक आहे काय?, अण्णाभाऊ साठे यांच्या



साहित्यातील नायक नायिका समता - स्वातंत्र्य बंधुत्व न्यायासाठी लढतात काय? आणि नैतिक मूल्यांचे संवर्धन फकीरा या कादंबरीतून अण्णाभाऊंनी दर्शविले आहे हे विषय निश्चित करण्यात आले आहेत. प्रत्येक स्पर्धकास ५ ते ७ मिनिटांचा वेळ दिला जाणार अण्णाभाऊ असून, भाषाशैली, विषयाची सखोलता, प्रभावी मांडणी आणि सादरीकरण या निकषांवर मूल्यांकन करण्यात येणार आहे. शालेय गटासाठी प्रवेश शुल्क ५०/-आणि महाविद्यालयीन गटासाठी १००/- निश्चित करण्यात आले आहे. सहभागी स्पर्धक आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या शिक्षकांसाठी भोजनाची विनामूल्य व्यवस्था आयोजकांकडून करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी वरिष्ठ आणि कनिष्ठ अशा दोन गटांमध्ये पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. वरिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक १०,०००, द्वितीय ७,०००, तृतीय ५,००० तर तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० आणि सर्वांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कनिष्ठ गटासाठी प्रथम पारितोषिक ७,०००, द्वितीय ५,०००, तृतीय ३,००० आणि तीन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी १,००० व प्रमाणपत्र दिले जाणार आहे. इच्छुक स्पर्धकांनी आपली नोंदणी १ ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश अर्ज स्कॅन करून ऑनलाइन फॉर्मद्वारे नोंदणी करता येईल. बीड, धाराशीव, नांदेड, परभणी, संभाजीनगर, लातूर आदी जिल्ह्यांतील शिक्षक समन्वयकांमार्फतही ही नोंदणी प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि स्पर्धेचे मुख्य संयोजक प्रा. प्रदीप रोडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ७०३०००८५६४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली मुंबईमध्ये शेकडो कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

बीड (सरकार):स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेल्या आहेत, या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. यामुळे जबाबदारी सर्व पदाधिकारी शिवसैनिकांनी स्थानिक स्वराज्य संस्थावर शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार करा आणि कामाला लागा. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान सर्वांना संबोधित केले.





हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन आणि महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे व संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, तालुकाप्रमुख वडवणी माऊली गोंडे, तालुकाप्रमुख धारूर नारायण कुरुंद यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातून रामदास भाई ढगे, संदिप माने, शिवाजी सावंत, महादेव मस्के, रमेश कुरकुटे, दत्ता सावंत, रमेश चौधरी, ज्ञानेश्वर मोरे, शिवाजी गोंडे, माऊली आगलावे. धारूर तालुक्यातून अनंत चिंचाळकर, शेख गफार शेख सत्तार, वशिष्ठ सातपुते , अनिल गांजले, सुनील कोमटवार, अमोल शिरसाट, दीपक चिद्रवार, विशाल भैरे यांच्या समावेत असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी काल दि. १५ जुलै २०२५ रोजी रात्री११ वाजता दरम्यान मुक्तागिरी निवासस्थान, मुंबई येथे उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी शिंदे साहेबांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेल्या आहेत, या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. यामुळे जबाबदारी सर्व पदाधिकारी शिवसैनिकांनी स्थानिक स्वराज्य संस्थावर शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार करा आणि कामाला लागा. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान सर्वांना संबोधित केले.

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

बीड (सरकार): माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

## जिद्द,परिश्रमातून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

### बीड जिल्हा प्रशासनातर्फे प्रेरणादायी व्याख्यानमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

बीड (सरकार): स्पर्धा परीक्षेचा प्रवास व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तरूणांच्या ध्येयपूर्तीसाठी स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन निश्चित जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येईल. तरी देखील प्रत्येकाने स्पर्धा परीक्षेत, यासह जीवनात यश संपादन करण्यासाठी स्वत:चे स्पष्ट ध्येय ठेवावे. जिद्द व परिश्रमातून आपल्या कुटुंबीयांसह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तरूणांना केले.

स्पर्धा परीक्षा तयारीत विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी



(ता.१४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन झाले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात परीविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्रीमती पूजा पवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेले उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीकृष्णकुमार बाहेती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, राजेश सुपेकर, महादेव चौरे, दादासाहेब शेळके आदी उपस्थित होते.

श्रीमती पवार यांनी स्वानुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. स्वप्नांचा पाठपुरावा, नैतिक मूल्यांची जाणीव आणि अभ्यासातील शिस्त या विषयांवर मार्गदर्शन केले. यशाचा प्रवास, अडचणींवर मात करण्याचे तंत्र, अभ्यासाचे नियोजन, वेळ व्यवस्थापन, परीक्षा तयारीतील सकारात्मक आणि नकारात्मक टप्पे याबाबत श्री. बाहेती यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नैतिक मुल्ये, कौटुंबिक आणि सामाजिक समतोल याबाबतही विचार मांडले. कार्यक्रमातील संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक आणि उपप्रादेशिक अधिकारी यांनी केले. अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे आणि शरद घोडके यांनी केले. आभार जाधवर यांनी मानले.

## भविष्यात येणाऱ्या निवडणुकीनां सामोरे जायचे आहे-परशुराम जाधव



बीड (सरकार): शिवसेनेत शिवसैनिक हे सर्वोच्च पद आहे, या पदाला कोणी हिरावून घेऊ शकत नही, म्हणून मी कोणी पदाधीकारी नाही असे म्हणून पक्ष कार्य थांबवू नका. येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीला सामोरे जायचे आहे त्या उद्देशाने तयारीला लागण्याच्या सूचना आज संपन्न झालेल्या आढावा बैठकीत संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव यांनी दिल्या.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची आज जिल्हा आढावा बैठक पार पडली. संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रत्येक पदाधिकारी आपले मनोगत, समस्या, अडचणी मांडत होता. त्या संपर्क प्रमुखांनी समजून घेऊन नोंदी करून घेतल्या. निवडणूका या खर्चिक जरी असल्या तरी शिवसैनिक हा जणसामान्यात ला असल्यामुळे त्याची एक वेगळी ओळख आहे. उमेदवारी व त्यांच्या ए बी फॉर्म ची निवड स्वतः पक्ष प्रमुख उद्धव साहेब हेच करणार असल्याचे संपर्क प्रमुख म्हणाले.

येणारी निवडणूक प्रत्येकाला विश्वासात घेऊन लढायची आहे, जे येतील त्यांना घेऊन, जे येणार नाहीत त्यांना सोडून येणारी निवडणूक लढणार आहोत, जागांची चाचपणी सुरु आहे, आवश्यक त्या ठिकाणी ताकत लावली जाईल असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम म्हणाले. शिवसंग्राम चे तालुका अध्यक्ष, पूर्वाश्रमीचे शिवसैनिक तथा माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे यांचा शिवसेनेत संपर्क प्रमुख परशुराम जाधव यांनी प्रवेश घेतला. यावेळी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी महिला आघाडी जिल्हाप्रमुख मीराताई नवले , युवासेना प्रमुख अभिषेक दिवे , जिल्हासमन्वयक संजय महाद्वार , जिल्हासंघटन नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप , राजूभाऊ महुवाले, आशिष मस्के , आदिनाथ खेडकर, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर , कामगार सेनेचे रवि वाघमारे, आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत , पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे , शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे ,गेवराई तालुकाप्रमुख अजय दाभाडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे , दादासाहेब सोनवणे, नंदू जोगदंड, अनिल माने, देवसिंह भिषेन, अक्षय सारणे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, कृष्णा चौरे,अजिंक्य डोरले सचिन वनवे, सोमनाथ लवूळ अशोक घोशीर ,आकाश कांकरिया ,महेश एकशिंगे, रामदास मोहिते ,शिवाजी थोरवे बाबुराव काळे, सचिन अमन साईनाथ ढाकणे, नामदेव आघाव, नारायण आघाव , राम सापते ,अक्षय काशीद, रंगनाथ पैठणकर

## मातोश्री शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत

बीड (सरकार) मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी १५ ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीमध्ये अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्यावतीने करण्यात आले आहे.

माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालय, आयटीआय, तंत्रनिकेतन आदी ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात प्रवेश दिला जातो. मागील वर्षात वसतीगृहात प्रवेश असलेल्या विद्यार्थ्यांना पुनर्प्रवेशासाठी ६० टक्के गुण आवश्यक आहेत. प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जुलै, २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्ट्या वगळता) सादर करावेत. त्रुटी असलेले, अपूर्ण अर्ज व अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असेही वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी कळविले आहे.

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडून जागतिक युवा कौशल्य दिन साजरा

बीड (सरकार): जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, रोजगार मेळावे, इ. योजनांविषयी माहिती देत जागतिक युवा कौशल्य दिन आज (ता.१५) उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले, कौशल्य विकास अधिकारी समाधान किरवले, जन शिक्षण संस्थानचे अध्यक्ष उपेंद्र कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीमती. डॉ. चोले, संचालक गंगाधर देशमुख, श्रीमती बागलाने, अमोल मुळे, नितीन क्षीरसागर आदी उपस्थित होते.

पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा अंतर्गत सहभागी होणाऱ्या टाटाएआयजी, समर्थ नर्सिंग कॉलेज, गुरुकुल इंग्लिश स्कुल, एलआयसी, बीड आणि एस.जी.सोलुशन्स या आस्थापनांचा, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत वैयक्तिक व्याज परतावा योजनेंतर्गत लाभ घेऊन उद्योजक झालेल्या लाभार्थ्यांचा, कौशल्य विकास योजनेंतर्गत उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्याबद्दल प्रशिक्षण संस्थांचा सन्मान करण्यात आला. जन शिक्षण संस्थान, बीड या संस्थेमार्फत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीसाठी आयोजीत कौशल्य विकास काळाची गरज या विषयावरील निबंध स्पर्धा आणि ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीसाठी आयोजित सौंदर्य व वेशभूषा स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जन शिक्षण संस्थान, बीड या संस्थेमार्फत प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीना मान्यवरांच्या हस्ते टुलकिटचे वाटप करण्यात आले. अध्यक्षीय समारोप श्री. कुलकर्णी यांना केला. सूत्रसंचालन श्रीमती मानुरकर यांनी केले. श्री. देशमुख यांनी आभार मानले.

## बीड,पाटोदा येथील पारधी समाजावर अन्याय: घरं आणि स्वप्नं उद्ध्वस्त





### आदिवासी पारधी विकास परिषद आक्रमक

पाटोदा (सरकार): बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे पारधी समाजाच्या कुटुंबांवर पोलिस आणि प्रशासनाने भर पावसाळ्यात केलेल्या कारवाईने संतापाची लाट उसळली आहे. अनेक वर्षांपासून सरकारी जागेवर राहणाऱ्या या कुटुंबांचे घर आणि त्यांनी उभ्या केलेल्या झाडांचा नाश प्रशासनाने कोणतीही पूर्वसूचना न देता केला. यामुळे आदिवासी पारधी समाजाला त्यांच्या मूलभूत निवारा हक्कापासून वंचित ठेवण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, या कारवाईविरोधात एक अपंग पारधी तरुण पोलिसांच्या पायावर लोळला, तरीही त्याला दया मिळाली नाही. या घटनेचा तीव्र निषेध करत आदिवासी पारधी विकास परिषद व ऑल इंडिया पँथर सेनेने तहसीलदार आणि पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

पारधी समाज, ज्यांच्यावर चोरीचा शिक्का लागलेला आहे, तो पुसण्यासाठी गाव सोडून शहरात आला. मेहनत आणि प्रामाणिकपणे काम करून स्वाभिमानी जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या या कुटुंबांना कोणतीही नोटीस न देता त्यांचे घर पाडण्यात आले. कसलीही पूर्वसूचना नाही, काही दिवसात व्यवस्था करण्याची संधी नाही, दुपारच्या वेळी आले आणि घर पाडून गेले, अशी व्यथा या कुटुंबांनी व्यक्त केली. पावसाळ्याच्या या काळात किमान दोन महिने थांबण्याची माणुसकीही प्रशासनाने दाखवली नाही.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या कार्यकाळात ही घटना घडली आहे. अजित पवार पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यात आदिवासी पारधी सुरक्षित नाही. एक अपंग तरुण विचारतोय, 'आम्ही आता कुठं जायचं?' याचं उत्तर व्यवस्थेकडे आहे का? असा सवाल आदिवासी पारधी विकास परिषदेने उपस्थित केला आहे. आदिवासी पारधी विकास परिषदेनेही या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला असून, या कुटुंबांना तात्काळ निवारा देण्याची मागणी केली आहे.

आदिवासी पारधी समाजाला निवारा हा मूलभूत हक्क आहे, परंतु अनेकदा अशा कारवायांमुळे त्यांना बेघर केले जाते. या कुटुंबांना आधी पर्यायी व्यवस्था न देता त्यांचे अतिक्रमण हटवण्यात आले, ही बाब सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर प्रश्नचिन्ह ठरते. पावसाळा संपेपर्यंत तरी थांबायला हवं होतं, अशी भावना आदिवासी पारधी विकास परिषदेचे प्रदेश युवा अध्यक्ष अतिश पवार यांनी व्यक्त केली. आदिवासी पारधी विकास परिषदेने या प्रकरणी तहसीलदार आणि संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, बेघर झालेल्या या कुटुंबांना सरकारने त्वरित घर आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणीही त्यांनी लावून धरली आहे. हा सामाजिक अन्याय आहे. आदिवासी पारधी समाजाला न्याय मिळालाच पाहिजे, असे आदिवासी सेवक बबन गोरामन यांनी ठणकावून सांगितले. या घटनेने सामाजिक न्यायाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. SocialJustice या हॅशटॅगखाली सोशल मीडियावर या प्रकरणाची जोरदार चर्चा सुरू आहे. आदिवासी पारधी विकास परिषदेने सरकारला या कुटुंबांना तात्काळ न्याय देण्याचे आवाहन केले आहे. आम्ही कुठं जायचं? हा प्रश्न विचारणाऱ्या अपंग तरुणाच्या आवाजाला आता व्यवस्थेने उत्तर द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. या घटनेनंतर प्रशासनाकडून कोणती पावले उचलली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. स्थानिक प्रशासन आणि पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून या प्रकरणी कोणती भूमिका घेतली जाते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. आदिवासी पारधी समाजाच्या हक्कांसाठी आणि सामाजिक न्यायासाठी हा लढा पुढे सुरू राहणार आहे.

## दिव्यांग, ज्येष्ठांना मोफत कृत्रिमसाहित्य वाटपासाठी पूर्व तपासणी शिबिर

बीड (सरकार): खासदार बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यामध्ये दिव्यांग व्यक्ती व जेष्ठ नागरिकांना मोफत कृत्रिम साहित्य साधने वाटपाच्या अनुषंगाने पूर्व तपासणी शिबिर प्रत्येक तालुक्यातील पंचायत समितीत १८ ते ३० जुलै २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे उद्घान १८ जुलै रोजी सकाळी १० वा. खासदार सोनवणे यांच्या हस्ते केज येथे होणार आहे. या शिबिराचा दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी एस. एन. मेश्राम व सर्व गटविकास अधिकारी यांनी केले आहे.

शिबिरात दिव्यांगांना जयपुरी फूट, कृत्रिम हात, कॅलीपर, व्हिलचेअर, ट्रायसिकल, क्रचेस, वॉकिंग स्टीक, ब्रेल किट, स्मार्ट फोन, श्रवणयंत्र यांसह जेष्ठ नागरिकांना बेल्ट, वॉकर, काठ्या, चष्मे, कृत्रीम दात, खुबड, कृत्रीम अवयव, श्रवणयंत्र, व्हिलचेअर कमोडसहीत, सिलीकॉन खोम तकीया, नीब्रेस, स्पायनल सपोर्ट, सरवायकल कॉलर यासह इतर साधने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांगांनी दिव्यांग प्रमाणपत्र आणि णउञखऊकार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, वार्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक २२ हजार ५०० रु. किंवा वार्षिक २ लक्ष ७० हजार रूपयांच्या आत असावे.) सोबत आणावीत. जेष्ठ नागरिकांनी आधार कार्ड, रेशन कार्ड, वर्षिक उत्पन्नाचा दाखला उत्पन्न (मासिक १५ हजार रु. किंवा वर्षिक एक लक्ष ८० हजार रूपयांच्या आत असावे) सोबत कागदपत्रे आणावयाची आहेत. केज येथे १८, अंबेजोगाई १९, बीड २१, माजलगाव २२, पाटोदा २३, वडवणी २४, आष्टी २५, धारूर २६, परळी वै.२८, शिरूर २९ आणि गेवराई येथे ३० तारखेला संबंधित पंचायत समिती कार्यालयात सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याचेही श्री. मेश्राम यांनी कळवले आहे.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)
Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)